अनुसूचित जमातीचे पडताळणीकरिता आवश्यक असलेल्या
प्रमाणपत्रे / इतर कागदपत्रांची यादी.

.....

अ] उमेदवाराची प्रमाणपत्र :-

१] उमेदवाराच्या जन्माच्या नोंदीचा जन्म रजिस्टरचा उतारा. [साक्षांकित प्रत].

२] उमेदवाराच्या प्राथमिक शाळेच्या प्रवेश रजिस्टरमधी नोंदीचा उतारा. [साक्षांकित प्रत].

३] उमेदवाराच्या प्राथमिक शाळा सोडल्याच्या मुळ दाखल्याची [साक्षांकित प्रत] [द्वितीय ] प्रतीची साक्षांकित प्रत नसावी]. द्वितीय प्रतीची साक्षांकित प्रत असल्यास, संबंधित मुख्याध्यापकाचे प्रवेश रजिस्टर व मुळ शाळा सोडल्याचा दाखला यातील मुळ जातीच्या नोंदीत बदल नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.

४] उमेदवाराचे जमातीचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र [मुळ प्रत] व एक साक्षांकित प्रत.

ब] उमेदवाराच्या वडीलांची प्रमाणपत्रे :-

५] उमेदवाराच्या वडीलांच्या जन्माच्या नोंदीचा जन्म, रजिस्टरमधील उतारा [साक्षांकित प्रत].

६] उमेदवाराच्या वडीलांचा प्राथमिक शाळेतील प्रवेश रजिस्टरमधील नोंदीचा उतारा [साक्षांकित प्रत].

७] उमेदवाराच्या वडीलांचा प्राथमिक शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रत [साक्षांकित प्रत].

८] वडीलांनी शासकीय / निमशासकीय सेवा केली असल्यास, सेवेत असल्यास सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानावरील [जमातीची नोंद असणा-या] नोंदीची प्रत. [साक्षांकित प्रत].

९] वडीलांचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले जमातीचे प्रमाणपत्र [मुळ प्रत].

क] वडील अशिक्षीत असल्यास जवळचे रक्तसंबंधातील [उदा. काका, आत्या, इ. समवयस्क] नातेवाईकांची प्रमाणपत्रे :-

१०] जन्माच्या नोंदीचे जन्म रजिस्टरमधील उतारे [साक्षांकित प्रत ].

११] प्राथमिक शाळेच्या प्रवेश रजिस्टरमधील नोंदीचे उतारे [साक्षांकित प्रत].

१२] प्राथमिक शाळेच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रत [साक्षांकित प्रत]

१३] सेवा केलेली असल्यास/सेवेत असल्यास सेवा पुस्तीकेच्या पहिल्या पानावरील नोंदीची प्रत [साक्षांकित प्रत].

ड] इतर कागदपत्रे :-

१४] उमेदवार / त्यांचे वडील/घरातील इतर व्यक्तीचे नावावर शेत जमीन असल्यास ७ x १२ चा उतारा.

१५ ] उमेदवार किंवा उमेदवाराचा जन्म १९५० नंतरचा असल्यास त्याचे वडील आजोबा १९५० मध्ये ते कोठील रहिवासी होते, त्या बद्दलची माहिती व पुरावा उपलब्ध असल्यास त्या कागदपत्रांच्या प्रती. [साक्षांकित].